X

**विभागीय निवड समिती, विभागीय आयुक्त कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर**

जाहिरात क्रमांक महसूल शाखा/सिआर-१८८/२०१४ दिनांक...18/05/2017

महसूल प्रशासनातील विभागीय आयुक्त स्तरावरील न्यायालयीन कामकाजासाठी विधी अधिकारी हे पद कंत्राटी पद्धतीने एकावेळी ११ महिन्याच्या कालावधीच्या मर्यादेत भरावयाचे असून त्याकरीता दिनांक ३१ मे, २०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. पदाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. पदाचे नांव :- विधी अधिकारी (एक पद)

२. कामाचे स्वरूप :- a) विभागीय आयुक्त स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणात परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे, इ. तसेच न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करून शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी शासकीय वकिलांना सहाय्य करणे इ. कामे

b) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणे सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

c) महसूल विषयक/परिच्छेदनिहाय अभिप्राय (parawise comments) तयार करणे/ सेवाविषयक / प्रशाकीय बाबी/ विभागीय चौकशी इ. तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती हाताळणे.

d) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी शासकीय अधिवक्त्याकडे पाठपुरावा करणे. जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

e) शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यात सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन विहीत मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.

f) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्अनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

g) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसूदा तयार करून तो संबंधित शासकीय अधिवक्ताकडे पाठविणे व अपिलचा अंतीम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

h) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर "नोडल ऑफीसर" म्हणून काम पाहणे.

i) विधी विषयक कामकाजांबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

३. मानधन :- एकत्रित मानधन रू. २०,०००/- (रू. विस हजार फक्त) + दुरध्वनी व प्रवास खर्च रू. ५०००/- (रू. पाच हजार फक्त) इतकी ठोक रक्कम.

४. वयोमर्यादा :- विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्ती वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५. शैक्षणिक अर्हता:- १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदविधर असेल, तो सनद धारक असेल.

२) विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा ७ वर्षाचा अनुभव आवश्यक.

३) उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न.

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.

६. अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **विभागीय आयुक्त कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.**

उमेदवारांचे प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत (तोंडी) घेण्यात येईल.

अर्जाचा नमुना व आवश्यक सुचना http://nagpur.nic.in/divisionalcommissioner/htmlscripts/index.asp या संकेत स्थळावर व कार्यालयाचे सुचना फलकावर देखील उपलब्ध आहे.

आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग नागपूर

अनूप कुमार

(अनूप कुमार)

विभागीयआयुक्त,

नागपूर विभाग, नागपूर

## विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
## विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने ) पदाकरीता अर्ज

अर्जदाराने अलिकडच्या काळातील राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकित केलेला फोटो चिकटवावा

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
जुने सचिवालय, जि.पी.ओ. समोर,
सिव्हील लाईन, नागपूर- 440001

विषय:- विधी अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूकी बाबत अर्ज.

संदर्भ:- दैनिक वर्तमानपत्र ------------------------------ दिनांक -------------------- मधील जाहीरात.

महोदय,

विधी अधिकारी या पदावर नेमणुक करण्याकरीता अर्ज करीत असून माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1 ) अर्जदाराचे संपुर्ण नांव (आडनांव प्रथम लिहावे) :- ------------------------------------------------

2 ) पत्र व्यवहाराचा पत्ता (पिनकोड व दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांकासह) :- ------------------------------------------------
------------------------------------------------
ई- मेल ------------------------------------------------

3 ) जन्म तारीख :- अंकात ------------------------------------------

अक्षरात ------------------------------------------

4 ) जाहीरातीचे दिनांकास वय :- वर्ष --------- महिने ------------ दिवस -----------

5 ) महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय? (आवश्यक प्रमाणपत्र जोडावे ) :- होय / नाही

6 ) विवाहीत / अविवाहित :- ------------------------------------------------

7 ) विवाहीत असल्यास लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे काय? (आवश्यक प्रमाणपत्र जोडावे ) :- ----------------------------------------

8 ) बार कौसिल ऑफ महाराष्ट्र व गोवा यांचेकडील सनद क्रमांक व दिनांक :- ----------------------------------------

9 ) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता :- (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्या)

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | विद्यापिठ/ मंडळाचे नांव | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा | | | | | |
| 2 | पदवी परिक्षा | | | | | |
| 3 | कायद्याची पदवी परिक्षा | | | | | |
| 4 | इतर | | | | | |

10 ) अनुभव :- (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्या)

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | पद | अनुभवाचा कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

11 ) संगणक अर्हता व इतर गुणवत्ता :-

12 ) अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची यादी :-

उमेदवाराची स्वाक्षरी

विधी अधिकारी

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना –अ

## प्रतिज्ञापन

( नियम- 4 पहा )

मी, श्री / श्रीमती /कुमारी ------------------------------------------------ श्री --------------------------
यांचा / यांची मुलगा /मुलगी / पत्नी , वय ------------- वर्ष, राहणार ------------------------------------------
याद्वारे असे जाहीर करतो / करते की,

1) मी, ---------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला -------------- ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च, 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------ आहे.
( असल्यास, जन्म दिनांक नमूद करावे. )

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या , मुलांमुळे सदर पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

---

## प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो /करते की, अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहिती नुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी /चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड /नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

मी याद्वारे शपथ पुर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरीता अपात्र घोषित केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही माझ्या विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी
(नाव व पत्ता )

# विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने) पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना आवश्यक सुचना

१) शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ मधील तरतूदीनुसार विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने एकावेळी ११ महिन्याच्या कालावधीच्या मर्यादेत भरावयाचे असून त्याकरिता दिनांक ३१ मे, २०१७ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२) अर्जदाराने अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

३) दिनांक ३१ मे, २०१७ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची दिनांक ०७ जून, २०१७ पर्यंत छाननी करून दिनांक ०७ जून, २०१७ रोजी http://nagpur.nic.in/divisionalcommissioner/htmlscripts/index.asp या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४) उमेदवारांचे प्राविण्य पडताळणी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत (तोंडी) घेण्यात येईल. याबाबतची सुचना दिनांक ०७ जून, २०१७ रोजी संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर लावून प्रसिध्द करण्यात येईल.

५) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नांव यथावकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६) निवड झालेल्या उमेदवाराने विहीत नमुन्यातील करारनामा करून देणे बंधनकारक आहे. करारनामा करून दिल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारास कंत्राटी पध्दतीने नेमणूक करीत असल्याचे आदेश देण्यात येतील.

७) कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवारास त्यांचे नेमणुकीचे पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.

८) या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा अथवा स्थगीत/रद्द करण्याचा अधिकार विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय निवड समिती यांना राहील व त्यांचा निर्णय अंतीम असेल.

***